# उ पो द् घा त

शेती हे भारतातील अग्रेसर क्षेत्र आहे. उत्पादन, प्रक्रिया व विपणन या कृषि अर्थव्यवस्थेच्या तीन आधार स्तंभापैकी विपणन आर्थिक विकासामध्ये मुलभूत भूमिका बजावते. वाढते औद्योगिकरण व वाढती लोकसंख्या यामुळे एकीकडे कच्चामाल पुरवठा व दुसरीकडे अन्नधान्याची वाढती मागणी पाहता शेतक-यांचे उत्पादन प्रमाण वाढविणे व त्याची सुव्यवस्थित कृषि विपणी असणे अत्यंतिक महत्वाचे ठरते. कृषि विपणनाची सुव्यवस्था व संतुलन ही समाजवादी समाजरचनेची अनिवार्य अट आहे. यासाठी शासनाने कायद्याच्या माध्यमातून नियंत्रित बाजारपेठा स्थापून अधिकारात्मक दिग्दर्शन केले. नियंत्रित बाजारपेठेची भूमिका, विकास, कार्य आणि प्रभाव अभ्यासण्यासाठी एक प्रातिनिधीक घटक म्हणून पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेची अभ्यासासाठी निवड केली आहे.

मी मंगळवेढयाचा दीर्घकाळचा स्थायी रहिवाशी आहे व विशेष म्हणजे पंढरपूर हे माझे जन्मगांव आहे. यामुळे तेथील मातीचे काही अंशी ऋण फेडण्याचा प्रयत्न या योगे केला आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर हे महत्वाचे तहशिल असून तेथील कृषि विकास चांगल्या प्रकारे झालेला दिसल्यामुळे पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार अभ्यासण्यासाठी निवडला.

या योगे पंढरपूर नियंत्रित बाजारपेठेचा विकास व कार्य,तालुक्यातील शेतक-यांची आर्थिक व सामाजिक स्थिती आणि बाजारपेठ स्थापनेमुळे शेतक-यांना शेतमाल विक्रीबाबत मिळालेले लाभ, तसेच बाजारपेठ विकासासाठी सुचना याबाबींचा अभ्यास केला आहे. सदर बाजारपेठे संबंधीची सद्य परिस्थिती विस्तृत प्रमाणात स्पष्ट करण्याचा हा एक प्रयत्न आहे. त्यामुळे हा अभ्यास परिपूर्ण व अखेरचा आहे असे मी मानीत नाही.

हा अभ्यास करण्याची संधी मला मिळाल्याने निरामय आनंदाचा लाभ घेता आला. आज हे काम पूर्ण होत असल्याने मला तात्विक समाधान होत आहे.

कोल्हापूर. — मधुकर रा. वेदपाठक

## कृ त ज्ञ ता

हा प्रबंध माझ्या आई-वडिलांच्या प्रेरणेचे, आशिर्वादाचे मूर्तरूप आहे. यानिमित्त आभार प्रदर्शन हा एक औपचारिक भाग असला तरी अंत:करणाची भावना व्यक्त करण्याचे एक माध्यम म्हणून मी त्याचा स्विकार करणार आहे. प्रबंध लेखन हे एक शोधयज्ञ आहे. या शोध-यज्ञाच्या भोव-यात स्वत:च्या साधनेवर अधिक भिस्त ठेवावी लागली तरी इतरांच्या सहकार्याशिवाय ही वाटचाल पूर्ण होत नाही. ज्यांचे-ज्यांचे सहाय्य झाले त्या सर्वांचे ऋण मनी आहे. ते व्यक्त करण्याचा हा प्रामाणिक प्रयत्न.

या कामी माझे संशोधन मार्गदर्शक डॉ. सुरेंद्र गो. भानुशाली, व्यवसाय अर्थशास्त्र विभाग प्रमुख, दे. र. कुं. वाणिज्य महाविद्यालय, कोल्हापूर यांनी जो माझ्यावर कृपाकटाक्ष ठेवला, त्यांचे मार्गदर्शन, त्यांची प्रेरणा, जिव्हाळा माझ्या कामात सतत चैतन्य देणारा राहिला. त्यांनी माझ्यासाठी दिलेला वेळ व वेळोवेळी केलेल्या महत्वपूर्ण सूचना यामुळेच प्रबंधपूर्ती होऊ शकली. त्यांच्या प्रेमळ, मौलिक व व्यासंगी मार्गदर्शनाचा मला अतिशय लाभ झाला.

प्रस्तुत प्रबंध विविध अवस्थांतून जात असताना मला अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभलेले आहे. विशेषत: प्रबंधाच्या सामग्रीच्या संदर्भात पंढरपूर तालुक्यातील आठ खेड्यांचे सर्वेक्षण करताना अंत:करण उचंबळून यावे अशी जवळीक, सहकार्य व दिलासा देणारी माणसे मला सर्व ठिकाणी मिळालेली आहेत. त्याबद्दल कृतार्थतेचे भाव अंत:करणात दाटून येतात. त्या सर्वांच्या सहकार्याबद्दल मी अंत:करणपूर्वक आभार मानत आहे.

# CERTIFICATE

This is to certify that SHRI MADHUKAR RAMCHANDRA VEDPATHAK has worked on "A STUDY OF AGRICULTURAL PRODUCE MARKET, PANDHARPUR" under my supervision and this dissertation is the result of his independent work, which is being submitted for the Degree of M.Phil. in Economics to Shivaji University, Kolhapur. I find that the work is complete and comprehensive and fit for submission.

KOLHAPUR,

May 30, 1989

Bhanushali

(DR. S.G. BHANUSHALI)
Research Guide
Head Department of Business Economics,
D.R.K.College of Commerce,
Kolhapur.

# प्र ति ज्ञा प त्र

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की, हा संशोधन प्रबंध "कृषि उत्पन्न बाजार, पंढरपूरचा अभ्यास" मी स्वत: संशोधित केला असून यापूर्वी हा कोणत्याही विद्यापीठीय स्तरावर कोणतीही पदवी या पदविका मिळविण्यासाठी सादर करण्यात आलेला नाही.

कोल्हापूर,
मे 30, १९८९

[ मधुकर रामचंद्र वेदपाठक ]
संशोधक

आई आणि अण्णा

[ सौ. सत्यभामा रा. वेदपाठक व श्री. रामचंद्र वि. वेदपाठक ]

यांना सविनय अर्पण

...

प्रस्तुत प्रबंधासाठी डॉ. व्हि.बी. घुगे, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर त्याचबरोबर डॉ. आर.आर. दोशी, डॉ. जे.एफ. पाटील, डॉ. टी.जी. नाईक, डॉ.सौ.एस.बी. पंडीत, श्री. ए.ए. डांगे, श्री. आर.जी. दंडगे आदी विभूतींचे प्रेरणा व सहकार्य लाभले. यामुळे त्यांच्या ॠणात राहणे मी माझे भाग्य समजतो.

श्री.औ.कौ. पाटील, माजी सभापती व संस्थापक, चेअरमन श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, पंढरपूर, श्री.शां.बा. बागल, सभापती, पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती, तसेच पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीचे श्री. मु.गो. करडे, प्र.सचिव, श्री. र.म. जवळे, लेखापाल आणि इतर कर्मचारी वर्गाच्या सहकार्या-शिवाय माझा अभ्यास विस्तारीतपणे मांडू शकलो नसतो.

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ग्रंथपाल व कर्मचारी, श्री संत दामाजी महाविद्यालय [मंगळवेढा] येथील प्राचार्य व ग्रंथपाल तसेच जवाहरलाल प्रशालेचे मुख्याध्यापक यांनी माझ्या कार्यास लागणारी अत्यंत मौलिक पुस्तके, नकाशे तत्परतेने पुरविली, त्यांचेही आभार.

श्री संत दामाजी महाविद्यालयाचे प्रा. आ.गो. पुजारी व प्रा. जाधवर सर तसेच येथील इतर प्राध्यापकांनी प्रबंध लिखाणास वेळोवेळी प्रोत्साहन दिले. तसेच ज्या मित्रांनी माझ्या कामात मदत केली त्या सर्वांचे ॠण मनी आहेच.

या प्रबंधाच्या टंकलेखनासाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल सुपर टाईपरायटींग सेंटर, कोल्हापूर यांचा आभारी आहे.

सरते शेवटी माझे अनुज श्री. प्रभाकर आणि रत्नाकर वेदपाठक यांनी एम.फिल. कोर्स पूर्ण करण्याची सुवर्णसंधी दिली. त्यांच्या आभारा शिवाय हा ऋणनिर्देश अपूर्णच वाटत होता त्यांचेही आभार मानतो.

या शिवाय जाणता-अजाणता सहाय्यभूत झालेल्यांचे परंतु नामनिर्देश करता आला नाही अशांचेही हार्दिक आभार मानित आहे.

कोल्हापूर. [ श्री. मधुकर रामचंद्र वेदपाठक ]